

श्रीकृष्ण जन्म.

श्रीहरिविजयकथासार

अथवा

हरिविजय ग्रंथांतील सुरस गोष्टी.

लेखक,

हरि विठ्ठल धावडे.

प्रकाशक—

पुरंदरे आणि कंपनी,

बुकसेलर्स आणि पब्लिशर्स,

माधवबाग-मुंबई.

आवृत्ति ११ वी.] सन १९२४, शके १८४६. [प्रती ३०००.

किंमत १ रुपाया.

प्रस्तावना.

प्राचीन कालीं व्यास वाल्मिकादिक ऋषिवर्यांनीं धर्म शास्त्रादिक पुराणग्रंथ संस्कृत भाषेंत करून ठेविले होते. परंतु समयावच्छेदेंकरून संस्कृत भाषेचा लोप होत जाऊन, प्राकृत जनांस त्या ग्रंथांतील अर्थ कळेनासा झाला. असें जाणु ज्ञानदेव, नामदेव, एकनाथ, तुकाराम, वामन पंडित, श्रीध महीपती इत्यादि महाराष्ट्र कवींनीं त्या संस्कृत ग्रंथाधा प्राकृत काव्यरचना करून ग्रंथ निर्माण केले. त्यांतील श्रीध कवीनें केलेल्या 'श्रीहरिविजय' नामक ओंवीबद्ध ग्रंथाचा सरळ गोष्टीरूपानें अध्यायवार कथाभाग जशाच्या तसा य पुस्तकांत मी अल्पमतीनें अज्ञजनांकरितां लिहून वाचक वृंदापुढें ठेविला आहे, तो आबालवृद्ध स्त्रीपुरुषांनीं वाचू आपल्या जन्माचें सार्थक करून घ्यावें, अशी सविन प्रार्थना आहे.

लेखक.

अथ

श्रीहरिविजय-कथासार.

अध्याय १ ला.

मंगलाचरण व देवांसह ब्रह्मदेवाचें क्षीरसागरीं गमन.

हे जगद्गुरु भीमातीरविहारा पुराणपुरुषा ! तूं आदिमायेचा निजवर सर्वांत श्रेष्ठ असून, ब्रह्मा विष्णु महेश्वर असे तिघे पुत्र निर्माण करून, त्यांच्या हातून अनंत ब्रह्मांडांची रचना करवितोस, सर्व देव तुझ्याच सत्तेनें वर्तन करितात; तूंच चौदा विद्यांचें भुवन गजानन असून, तुला सहा सिद्धी हस्त जोडतात. हे गणनाथ ! तुझ्या नामस्मरणानें विघ्नें बारा वाटे पळतात त्या तुला माझें नमन असो. मला त्वां अभय देऊन पद्यरचना करण्यास स्फूर्ति दे. तसेंच चार वाचांची ईश्वरी जी ब्रह्मतनया सरस्वती देवी, तिलाही मी अनन्य शरण आहें. आणखी ज्यांनीं आपल्या दयेंकरून गणेश सरस्वतीचें स्तवन वदविलें तो ब्रह्मानंद सद्गुरु पिता व सावित्री माता यांस माझें साष्टांग नमन असो. तसेंच संतसज्जन, श्रीवेद-

व्यास, वाल्मिक, वशिष्ठ, शुक आदिकरून कविजनांस व श्रोत्यांस माझें नमन असो. अशा प्रकारें श्रीधरकवीनें प्रार्थना करून ग्रंथास आरंभ केला.

श्रीधर कवी सांगतात—भगवंताचा श्रीराम अवतार संपल्यावर पृथ्वीवर कंस, चाणूर, मुष्टिक, अघ, बक, केशी, प्रलंब, शिशुपाळ, वक्रदंत व जरासंधादिक प्रबळ दैत्य माजून चतुर्दश लोकांस पीडा देऊं लागले; जरासंधाच्या बंदिशाळेंत बावीस हजार राजे पडले. बाणासुर, काळयवनादिक गाईब्राह्मणांचा संहार करूं लागले; विष्णूचें भजन राहून, ऋषींचें ध्यान, अनुष्ठान, तप जागच्या जागीं राहिलें. असें घोर पाप होतांच, पृथ्वी कंपायमान होऊन गाईच्या रूपानें ब्रह्मदेवाच्या द्वारांत जाऊन उभी राहिली, आणि आक्रोशानें बुडालें बुडालें ह्मणून ओरडूं लागली. तेव्हां ब्रह्मदेवानें चिंता करूं नको ह्मणून अभय दिलें.

त्यावेळीं पर्जन्यकाळच्या पुराप्रमाणें ऋषींचे भार ब्रह्मदेवाजवळ येऊन सांगूं लागले. एक ह्मणाला—कंसानें गांजलें, एक ह्मणाला—काळयवनानें पीडा दिली, भौमासुरानें यज्ञ मोडले. कोणी ह्मणाले—स्त्रिया भ्रष्ट केल्या, कन्या धरून नेल्या. अशाप्रकारें प्रजाजन ब्रह्मदेवापुढें गाऱ्हाणें सांगूं लागले. तोंच सर्व देवांसह इंद्रही आला; त्यास

ब्रह्मदेव ह्मणाला—आतां क्षीरसागरीं जाऊन जगदोद्धारा-जवळ गाऱ्हाणें सांगूं चला ह्मणजे आपला कार्यभाग होईल. असें सांगून ब्रह्मदेव सर्वांसह क्षीरसागरीं निघून गेले.

अध्याय २ रा.

क्षीरसागरीं ध्वनि, वसुदेव व कंसाचा जन्म, वसुदेवदेवकीचें लग्न व कंसानें सहा बाळें मारिलीं.

ब्रह्मदेव पृथ्वी, इंद्रादिदेव, ऋषिजन, प्रजा यांसह क्षीर-सागराच्या ऐल तिरीं येऊन उभा राहिला. त्या क्षीराब्धीचा महिमा कोटी वर्षेंपर्यंत वर्णन केला तरी अंत लागणार नाहीं. तेथील मंडप उंच रुंद चतुष्कोनीं लक्ष योजनांचा आहे. त्यावर लक्षार्ध योजनें शेषशाई पसरला आहे. त्याचें लक्ष्मीस प्रत्यक्ष दर्शन घडतें. तें क्षीरसागरीचें रूप कोणा-च्यानेंही पाहवत नाहीं. जे ज्ञानदृष्टीनें पाहतात त्यांस मात्र भगवंत जवळ आहे.

त्या क्षीर सागराच्या ऐल तिरीं ब्रह्मदेव सर्वांसह हात

जोडून प्रार्थना करूं लागला कीं, हे ॐ नमो आदिनारायणा ! शेषशाई पुराणपुरुषा सृष्टिपालका ! तुझ्या आज्ञेनें आह्मीं वर्तत असतां, दैत्यांनीं पृथ्वीवर विघ्न मांडून सर्वांस त्रास दिला आहे. याचा काय विचार करावा ? तूं दयेचा सागर जगदोद्धार आहेस; असें बोलून स्थब्ध झाले. तों क्षीरसागरांतून अंतरिक्ष ध्वनी उठली कीं, " भिऊं नका व मनांत चिंता करूं नका. " मी यादव कुळांत अवतार घेऊन दुष्टांचा संहार करीन. तुह्मीं सर्व देव यादव व्हा, उपदेवांनीं गोकुळांत गोपाळ व्हावें, ऋषींनीं वांसरें व्हावें; यम, वायु, इंद्र, अश्विनीकुमार यांनीं कुंतीच्या उदरीं अवतरून भूभार हरण करावा. बृहस्पतीनें द्रोण होऊन पांडवांस विद्यादान द्यावें. द्रुपदराजाचे यज्ञांत अग्नीनें धृष्टद्युम्न व्हावें, पार्वतीनें द्रौपदी व लक्ष्मीनें रुक्मिणी होऊन भीमकाचे उदरीं अवतार घ्यावा. संकर्षण बळीभद्र होऊन, वसुदेवदेवकीनें तीन जन्मपर्यंत तप केलें ह्मणून मी त्यांचा पुत्र होईन. अशी आकाशवाणी होतांच, देवांनीं जयजयकार करून साष्टांग नमस्कार घातला. त्यावेळीं अयोध्येस जसा रघुनाथ येतांच भरतास आनंद झाला, तसा सर्व देवांस ब्रह्मानंद झाला.

इकडे गोकुळांत यदुवंशांतील शूरसेनास पुत्र झाला, त्याचें आनकदुंदुभी (वसुदेव) असें नांव ठेविलें. त्याच्या जन्मकाळीं

वासुदेव पोटीं अवतरणार म्हणून देवांनीं दुंदुभी वाजविल्या. त्यांचें लग्न मथुरेंत आरंभिलें होतें.

मथुरेचा राजा उग्रसेन, त्याचा पुत्र कंस तो पितृरेताचा नव्हता. उग्रसेनाच्या पतिव्रता स्त्रियेस एका दैत्यानें अवचित अरण्यांत उचलून नेऊन बळेंच भोगिली आणि म्हणाला–तुला पुत्र होईल. मग सती त्याला म्हणाली–तुझा जो पुत्र होईल त्याला श्रीकृष्ण क्षणांत आपटून मारील. नंतर तो दैत्य पळून गेला. पुढें तिला जो पुत्र झाला तोच कंस होय. तो बापास मागें लोटून स्वइच्छेनें राज्य करून विष्णुभक्त गाई ब्राह्मण यांस जिवें मारूं लागला. अशा त्या कंसानें सत्कर्म बुडवून, मुष्टिक, चाणूर, केशी, प्रलंभ, अघासुर, व्योमासुर, असुरासुर, कागासुर, खर, तोशल, धेनुकासुर, इत्यादिकांस बरोबर घेतलें होतें.

उग्रसेनाची कन्या देवकी उपवर होतांच, तिला वसुदेवास वर नेमिला. तेव्हां शूरसेन, पुत्रास घेऊन मथुरेस लग्न करण्यास आला. कंसानें देवकीचा नवरा पाहतांच संतोषित होऊन, सर्व लग्नसमारंभाची तयारी स्वतः केली. असा लग्नसमारंभ मथुरेंत पूर्वीं कधीं झालाच नव्हता. पुढें वसुदेव देवकीची वरात वाद्यगजरांत मोठ्या थाटानें निघतांच, कंस आनंदानें सारथी झाला होता; तों अकस्मात देववाणी झाली कीं,

" अरे ! निर्दयिया कंसा ! तूं आनंदांत निमग्न झाला आहेस, परंतु देवकीचा आठवा पुत्र तुझा वध करील. "

असें ऐकतांच कंस दचकून रथाखालीं उडी टाकून हातांत शस्त्र घेऊन, देवकीची वेणी धरून तिला रथाखालीं पाडिली आणि मानेवर शस्त्र ठेवणार, तोंच देवकी करुणावाणीनें बंधूस ह्मणाली–दादा ! माझा अपराध काय पाहिलास ह्मणून वध करित आहेस ? तूं माझा कैवारी असतां, माझ्यावर कां कोपलास ? अशी तिची करुणा ऐकतांच सर्व जन व उग्रसेन दुःखसमुद्रांत बुडाले. उग्रसेन ह्मणाला–अरे कंसा चांडाळा ! माझ्या गळ्याची चंपककलिका देवकी ! तिचा वध कां करतोस ? तोंच वसुदेव रथाखालीं उडी टाकून कंसाचा हात धरून ह्मणाला—अरे ! स्त्रीवधानें पाप फार होतें, तें सांगतों ऐक—

एक रथभर किडे वधल्यानें एक मेंढा मारल्याचें पाप लागतें, शंभर मेंढे मारल्यानें एक बैलवध, शंभर बैल वधल्यानें एक गोहत्त्या, शंभर गोहत्त्येपेक्षां एक ब्रह्महत्त्येचें पाप आणि शंभर ब्रह्महत्त्या केल्या तर एक स्त्री वधल्याचें पाप लागतें; यास्तव मला स्त्रीदान दे. कंस ह्मणाला–हिचा पुत्र माझ्या जिवाचा घातक होय, ह्मणून मी हिला जीवंत ठेवणार नाहीं. असें बोलून शस्त्र उचललें. वसुदेव ह्मणाला–

मला जो पुत्र होईल तो मी तुला देईन. असें वचन ऐकतांच, कंसानें उभयतांस बिड्या ठोकून बंदिशाळेंत कोंडून भोंवतीं रक्षकांचा पहारा ठेविला.

कंस अशी करणी करून गेल्यावर देवकी गर्भिणी राहून, तिला प्रथमच पुत्र झाला. त्याला पाहतांच वसुदेव ह्मणाला—बाळा ! तुझें मरण जवळ आलें ! असें बोलतांच देवकीचा कंठ सद्गदित झाला. ती ह्मणाली—स्वामी ! भाकदान दिल्याप्रमाणें हा पुत्र कंसास नेऊन द्यावा. जर बंधूस कृपा आली तर याला सोडून देईल. मग रक्षकांसह वसुदेव बाळास घेऊन कंससभेंत आला. कंसानें तें सुंदर बालक पाहतांच त्याला स्नेह उत्पन्न होऊन, प्रधानास ह्मणाला—जो आठवा पुत्र होईल तो आपला शत्रु ! हे पूर्वींचे सात कशाला वधावे ? हे याचे याला असोत. असें बोलून वसुदेवास ह्मणाला—हा आपला बाळ परत न्यावा, जो आठवा होईल तो मात्र मला आणून द्यावा. असें कंसाचें वचन ऐकून, वसुदेव मुलास घेऊन, बंदिशाळेंत येऊन देवकीस सर्व वर्तमान सांगितलें. त्यावेळीं जसा गेलेला प्राण परत यावा तसा देवकीस संतोष झाला.

इकडे कंससभेंत नारदाची स्वारी आली, त्याचें कंसानें पूजन करून सर्व वर्तमान सांगितलें. तेव्हां नारद ह्मणाला—

राजा ! तुझें चित्त कसें भुललें ? तूं वसुदेवाच्या पुत्रास सोड-लेंस परंतु तुझा शत्रु कोणता याचा अदमास केलास काय ? आठांपासून उफराटें मोजलें असतां तुझा शत्रु पहिला होतो. दुसरा तिसरा किंवा चौथा, आठांमध्यें तुझा कोणता घात करील तें कळत नाहीं. असें नारदाचें वचन ऐकतांच, कंसानें मान हालविली आणि तसाच बंदिशाळेंत आला. त्याला पाहतांच देवकीला काळ भासून तिनें मुलास पदराखालीं झांकिलें. तोंच बाळ कोठें आहे ह्मणून कंसानें विचारितांच, देवकीनें एवढें पुत्रदान द्यावें ह्मणून निर्दयाचे चरण धरिले. परंतु त्याला दया न येतां बालकाचे चरण धरून दारांत चंडाशिळा होती तीवर आपटलें; त्याबरोबर तें पक्व फळासा-रखें छिन्नभिन्न झालें. नंतर कंस निघून गेला.

पुढें देवकी दुसऱ्यानें गरोदर राहून प्रसूत झाली. तें बालक व त्यानंतर झालेलीं पांच अशीं सहा बाळें कंसानें आपटून मारिलीं. त्यावेळीं वसुदेवदेवकीचें हृदय दुःखानें फुटून गेलें. असा कंसाच्या पदरीं असंभाव्य पापाचा सांठा झाला. पुढें श्रीहरी क्षीरसागरीं काय विचार करील तें श्रवण करावें.

———

अध्याय ३ रा

बलराम श्रीकृष्णजन्म व मायेचें आकाशीं गमन.

हे अनंतब्रह्मांडनायका ! पृथ्वीचें वजन, समुद्राचें पाणी, भूमीवरील तृणांकुर, आकाश किती वितो आहे इत्यादिकांची गणती करतां येईल, परंतु तुझ्या गुणांचें वर्णन कोणाच्यानेंही करवणार नाहीं.

कंसानें देवकीचे साहा गर्भ वधिले, गाई ब्राह्मणांस पीडा दिली, तेव्हां क्षिरसागरवासी अनंत शेषास ह्मणाला—आतां आपण अवतार घेऊन दुष्टांचा निःपात करूं चला. तें वचन ऐकून शेष ह्मणाला—मी पूर्वी सौमित्र होऊन फार कष्ट भोगिले, आतां मी अवतार घेणार नाहीं. तुह्मींच अवतार घेऊन गाई ब्राह्मण, साधुजन यांचा प्रतिपाळ करावा. विष्णु ह्मणाला—तूं माझा समरभूमीचा पाठिराखा, तुझ्याशिवाय मला एक क्षण गमत नाहीं, मग मी तुझ्याशिवाय अवतार कसा घेऊं ? तरी तूं जाऊन माझा वडील बंधु बळिभद्र होऊन देवकीच्या गर्भी जाऊन राहा, मी तुझी आज्ञा पाळीन. तुझ्यामागें योगमायेसही पाठवितों. कंसानें सर्व गर्भांचा वध केला, तरी तुला योगमाया गोकुळांत नेऊन

रोहिणीच्या गर्भांत ठेवील. माया यशोदेच्या पोटीं जाईल. मग मी मथुरापुरास देवकीच्या गर्भांत अवतार घेऊन उपजतांच गोकुळांत येईन. मग तुह्मीं आह्मीं गुराख्याच्या मिषानें खेळून संपूर्ण दैत्यांचा संहार करूं. असें ऐकून संकर्षण साष्टांग नमस्कार घालून देवकीच्या पोटीं सातव्या गर्भांत जाऊन राहिला.

एके दिवशीं वसुदेवास देवकी ह्मणाली—मी सहा वेळ गर्भिणी झालें परंतु या गर्भाचें मला नवल वाटतें. मला असें वाटतें कीं पृथ्वी उचलून आकाशास धीर देईन, सात समुद्र नखाग्रांत सांठवीन, हातांत नागर मुसळ घेऊन कंसदळाचें मर्दन करीन. असें ऐकून वसुदेव ह्मणाला—ईश्वराची करणी कळत नाहीं; एवढा तरी वांचून विजयी होवो. सातवा महिना लागून देवकी निद्रिस्त असतां, जिनें निर्गुणास गुण लाविला, पतीस न कळतां, गर्भिणी झाली, इच्छामात्रानें ब्रह्मांड रचिलें, भ्रतारास शेजेवर निजवून सृष्टीची घडामोड केली, जिवांस नानायोनींत घातलें; अशा त्या मायाराणीनें देवकीचा गर्भ काढून, गोकुळांत वसुदेवाची पत्नी रोहिणी कंसाच्या धाकानें नंदगृहांत लपून राहिली होती, ती निद्रिस्त असतां तिच्या पोटांत नेऊन घातला. रोहिणी जागी होऊन आपणास सात महिन्यांची गर्भिणी पाहून चिंताक्रांत

झाली. तो समाचार नंद यशोदेसही कळतांच, त्यांस अचंबा वाटला. इतक्यांत आकाशवाणी झाली कीं, " रोहिणी ! चिंता करूं नको, हा वसुदेवाचा गर्भ असून, पृथ्वीचा भार उतरण्याकरितां शेषानें अवतार घेतला आहे. असें उत्तर ऐकतांच समस्तांस सुख झालें.

पुढें नवमास भरतांच बळिराम जन्मला. त्याचें नंदानें जातक वर्तवून बळिभद्र असें नांव ठेविलें. नंतर हरिमायेनें यशोदेच्या पोटीं अवतार घेतला. इकडे देवकी जागी झाली तों पोटांत गर्भ नाहीं. तेव्हां ती वसुदेवास ह्मणाली–गर्भ धरणीवर न पडतां पोटांत जिरून गेला. वसुदेव ह्मणाला– कंसाच्या धाकानें गर्भ जिराला असेल ! ईश्वराची करणी अगाध आहे.

गर्भ जिरल्याची बातमी कंसास कळतांच, तो रक्षकांस ह्मणाला–आतां आठव्याची आठवण विसरूं नका. देवकीच्या गर्भांतील आठवा कंसाच्या ध्यानीं मनीं बसून, त्याला जिकडे तिकडे आठवा दिसूं लागला. अर्थात् आठव्यानें त्यास व्यापून टाकिलें. इकडे क्षीरसागरीं श्रीहरीनें लक्ष्मीस आज्ञा केली कीं, तूं वैदर्भ देशांतील भीमक राजाचे पोटीं अवतार घे. असें ऐकतांच लक्ष्मी साष्टांग नमन करून चालती झाली. जगद्वंद्य मथुरापट्टणांत देवकीच्या गर्भांत

येऊन राहतांच तिचें तेज जगतांत मावेनासें होऊन मुखानें डुलूं लागली. देवकी देहावर नसून तिला अवघा मुरारी दिसूं लागला. वसुदेव देवकीस ह्मणाला–तुला चिंता कां वाटत नाहीं ? आतां आठव्याची गती काय होईल कळत नाहीं. देवकी भुजा पिटून बोलली–एका क्षणांत कंसास आपटून मुष्टिक चाणूरांचा प्राण घेईन. नंतर हांक फोडून ह्मणाली–बंदिशाळा फोडून दैत्यांचा संहार करून पृथ्वीचा भार उतरीन. धनुष्यबाण लौकर आण, मी दारुण युद्ध करून, जरासंधास सत्रावेळ रथास बांधून आणीन, काळयवनाचें भस्म करीन, द्वारकापट्टण रचीन, सर्व नृपांस शिक्षा लावून पट्टराणी आणीन, मी भक्तांचा सारथी होऊन दुष्टांचा संहार करीन. मी पृथ्वीवर ब्रह्मानंद अवतरलों आहें.

असें ऐकतांच, वसुदेवास चिंता वाटून तो देवकीस ह्मणाला–देवकी ! आतां उगाच राहा. देवकी बोलली–मी देवकी कोठची ? मी ब्रह्मसनातन आहें. मीच अज अजित कर्ता हर्ता पाळिता होय. असें बोलून स्तब्ध झाली, तोंच देवांनीं आकाशांत दुंदुभीचा गजर केला; आणि देव आतां अवतरेल ह्मणून मथुरेंत गुप्तरूपानें उतरून हस्त जोडून गर्भाची स्तुति करून अंतर्धान पावले.

कंसाला आठव्याचा ध्यास लागून तो एका दासीस

ह्मणाला–गर्भाला किती महिने झाले ? दासीनें नऊ महिन्यांस थोडी अवधी आहे असें सांगितलें. मग कंसासुर देवकीपुढें येऊन उभा राहिला, परंतु देवकी नासाग्रीं दृष्टी ठेवून निर्भय होती, तिची स्त्रीची आकृति त्याला न दिसतां शंख चक्रयुक्त चतुर्भुज रूपडें दिसूं लागलें. त्याबरोबर कंसाच्या हातांतील शस्त्रें गळून बोबडी बळली व मुरकुंडी पडली, आणि भयानें ओरडून शस्त्र आपटून बोलूं लागला, मला आठव्यानें व्यापिलें त्याला सगळेंच गिळून मारून टाकीन.

नंतर श्रीकृष्णाचा जन्मकाळ जवळ आला असें जाणून आकाशांत देवांच्या विमानांची दाटी झाली. देवकी मध्य रात्रीं निद्रिस्त असतां श्रावण वद्य अष्टमी बुधवार रोहिणी नक्षत्र ते दिवशीं आठ वर्षांची चतुर्भुज मूर्ती देवकीपुढें उभी राहिली. तोंच देवकीनें जागृत होऊन, बालकावरून जिवाचें लिंबलोण केलें आणि ह्मणाली–हे भक्तवत्सला ! लोक तुला माझा पुत्र ह्मणतील अशी माझी इच्छा पूर्ण कर. श्रीहरी ह्मणाला–मी बालक होतों परंतु मला गोकुळांत नेऊन घालावें. तेथें माझा वडील बंधु बळिभद्र आहे तो आणि मी मग तुमच्या दर्शनास येऊं. असें बोलून आपल्या योगमायेनें देवकीस मोहून आपण तिच्यापुढें बाळ झाला. त्यावेळीं बंदिशाळेंत असंभाव्य तेज प्रगटलें. मग

देवकीनें वसुदेवास उठवून ह्मटलें—या अयोनिसंभव पुतळ्यास गोकुळांत नेऊन घाला. वसुदेव ह्मणाला—पायांत बिड्या, द्वारांत रक्षक असून कुलपें लावलेलीं, पर्जन्यामुळें यमुनेस पूर आलेला, यांतून मी बाहेर कसा जाऊं ? असें बोलून सद्गदीत होऊन, श्रीकृष्णाकडे पाहिलें, तोंच बिड्या तुटून गेल्या. असें पाहून वसुदेवास नवल वाटलें. मग श्रीकृष्णास घेऊन चालला; तों मायेच्या नेत्रांतून आंसवांच्या धारा सुरू झाल्या. तेव्हां श्रीकृष्णानें मातेकडे पाहून हास्य वदन केलें. त्यावेळीं श्रीकृष्णानें दरवाज्यांस पायांचा स्पर्श करितांच, सर्व द्वारें मोकळीं होऊन रक्षक निद्रेंत निमग्न झाले. पर्जन्य पडत होता ह्मणून फणींद्रानें आपला फणा श्रीकृष्णावर धरिला. वसुदेव पुढें येतांच यमुनेस पूर आला होता तरी तसाच पाण्यांत शिरला. जसजसा श्रीकृष्णास वर उचली तसतसें पाणी वर चढूं लागून तें वसुदेवाच्या कंठास लागलें तोंच वसुदेवानें धांवा केला.

मग कृष्णानें उजव्या पायानें यमुनेस स्पर्श केला, तोंच तिचे दोन भाग होऊन, वसुदेवास रस्ता मिळतांच नंदभुवनीं आला. इकडे यशोदा निद्रिस्त असतां, तिला कन्या झाली; तेथें वसुदेव जाऊन तिच्यापुढें श्रीकृष्णास ठेवून कन्या उचलून घेतली आणि कोणास न कळतां त्याच मार्गानें बंदिशाळेंत



श्रीकृष्णास वसुदेव गोकुळांत नंद-यशोदेकडे नेत आहे.

आला. तेव्हां दरवाजे पूर्ववत् बंद झाले. बंदिशाळेंत कन्या रडूं लागली. तिचें रडणें रक्षकांनीं ऐकून देवकी प्रसूत झाल्याचें वर्तमान कंसास कळविलें. त्याबरोबर कंस पिशाच्यासारखा बंदिशाळेंत धांवत आला आणि माझा आठवा अरी कोठें आहे ह्मणून विचारूं लागला.

देवकी ह्मणाली–बंधुराया ! एवढा वध करूं नको. पण तें न ऐकून व पुत्र किंवा कन्या तेंही न पाहून रागानें शिळेवर आपटण्यास गरगर फिरविली. तेव्हां ती शक्ति हातांतून निसटून, सहस्रविजांसारखी कडकडत निघून गेली. असें पाहतांच वैरी हातांतून गेला असें बोलून कंस भयाभीत झाला. तेव्हां ती तेजस्वी शक्ति त्याला आकाशांत दिसली. ती कंसास ह्मणाली–'अरे मूढा दुराचारा ! तुझा वैरी पृथ्वीवर वाढत आहे.' असें वचन ऐकतांच कंसाचें मन धगधगीत झालें. शक्ति अदृश्य झाली व कंस मंदिरांत आला.

अध्याय ४ था.

श्रीकृष्णाचें जातकवर्णन, महाबळभटविटंबना व पूतनाप्राणहरण.

जी सुरवरांच्याही लक्षांत न येणारी अशी श्रीहरीची

माया, तिला कंस आपटावयास जातांच, ती हातांतून निसटून गेली. जिणें ब्रह्मादिकांसही संकटांत पाडलें; तिच्यापुढें कंस मशक तो काय? त्या दिवसापासून कंसास धाक बसून, तो प्रधान कारभाऱ्यांवर धांवत जाऊन तुह्मींच माझे शत्रु दावेदार असें बरळूं लागला.

इकडे गोकुळांत चक्रपाणी यशोदेच्या पुढें पडला असतां, यशोदा जागी होतांच उठून बसली, तों राजीवनयनमूर्ति दृष्टीस पडली. तिनें यशोदेचें मन मोहून टाकिलें. श्रीकृष्ण वर मुख करून हास्यवदनांत आपल्या पायाचा आंगठा चाखूं लागला. त्याचें तेज सदनांत मावेनासें झालें. हें रोहिणी व गौळणींस कळतांच त्या तेथें धांवत आल्या. दारांत मंडप उभारले, ब्राह्मण व उपाध्याय गर्गमुनी धांवत आले. वाद्यांचे गजर सुरु झाले, नंदद्वारीं जनांची व आकाशांत देवांच्या विमानांची दाटी झाली. नंद मंगलस्नान करून पुत्रमुख पाहण्यास गर्ग आदि ब्राह्मणांसह निघाला. पुण्याहवाचन करून मधुबिंदु मुखांत घातला. नंदाला अनंतजन्माचें फळ प्राप्त झालें असें वाटलें. दोन लक्ष गाई, दिव्यरत्नें, अलंकार, भूषणें यांचीं दानें केलीं, गौळणी अक्षयवाणें घेऊन आल्या. स्त्रियांनीं हळदीकुंकवाचीं ताटें भरून आणिलीं, नंदानें आलेल्या मंडळीस वस्त्रालंकारांनीं गौर-

विलें, रत्नखचित पलंगाचे पुढें चौरंग ठेवून त्यावर यशोदा श्रीकृष्णास घेऊन बसली होती. नंतर गर्गमुनी जातक-वर्णन करूं लागला.

गर्गमुनी ह्मणाला–"मुलाचा जन्मकाळ फारच उत्तम असून, हा त्रैलोक्यभर कीर्ति करील, याला पुष्कळ वैरी आहेत पण तो कोणास आटपणार नाहीं. एक स्त्री विषानें स्तन भरून येईल तिचें हा शोषण करील, चंडवायु आकाशांत उडवून नेईल, त्या दैत्याचें मर्दन करील, गाड्याचा चुराडा करील, दोन वृक्ष मोडून अंगावर पडतील, गौळणींस मोहित करील, यमुनेंतील कालसर्पाचें याला भय आहे, तेथें विजयी होईल. याच्या बापास सर्प गिळील तेथेंही आपला पराक्रम दाखवील, बारा गांवें अग्नि भक्षील, नखावर पर्वत धरील, गाई राखील. कंसास मारून दैत्यांचा संहार करील, सर्वांस बंदींतून सोडवील, मेलेले गुरुपुत्र आणून देईल. समुद्रांत नगराची रचना करील, महादैत्य संहारून मुख्य पट्टराणी वरील, सोळाहजार स्त्रिया एकदांच पर्णील. आठ पट्टराण्या व सोळा हजार एकशें स्त्रिया करील, संतती फार वाढेल, धरणीचा भार उतरील, धर्माचे घरीं उच्छिष्टें काढील, भक्ताचा सारथी होईल, दिवसेंदिवस लीलाचरित्र दाखवील, स्वगोत्रास निजधामास घेऊन जाईल.

असें जातक ऐकून नंदराणी तटस्थ झाली. चक्रपाणी स्तनपान करीत असतां गर्गाकडे पाहून हास्य करूं लागला. बारा दिवस सोहळा होऊन नंदानें अपार द्रव्य वांटलें. तेरावे दिवशीं पाळण्यांत घालून गर्गानें श्रीकृष्ण असें नांव ठेविलें. जो नाना साधनांनीं ब्रह्मादिकांच्या ध्यानास येत नाहीं त्याला स्त्रिया जो जो ह्मणून हालवूं लागल्या. सकल स्त्रिया यशोदेची ओटी भरून वस्त्रालंकार अर्पून आपापल्या घरीं गेल्या. नंदानें गर्गादि ब्राह्मणांस वस्त्रालंकार दानें देऊन बोळवण केली.

गोकुळांत गोपाळानें अवतार घेतांच चिंता, दरिद्र, दुःख, दोष, दुष्काळ पळून गेले. मथुरेंत कंसास दुश्चिन्हें जाणवूं लागलीं, राजद्वारीं कुत्र्या रडणें, सभेवर विजा पडणें, पृथ्वीचा स्फोट होणें, रक्ताचा पर्जन्य पडणें, इत्यादि प्रकार होऊं लागले. कंस सभेंत चालला असतां मुगूट उगाच खालीं पडला, सभा व वीर प्रेतवत् दिसूं लागले. मस्तकावर तेल शेंदूर घातला असें कंसानें स्वप्नांत पाहिलें, घुबडाचे स्वर दिवसा ऐकूं येऊं लागले. त्यावेळीं कंसास मरण जवळ आलें असें वाटलें. कंसस्त्रियांनीं स्वप्न पाहिलें कीं, विधवा स्त्रियांनीं धुळीनें ओंट्या भरिल्या, मंगळसूत्र व गळसरी काळपुरुषानें तोडून नेली.

अशीं नानाविघ्नें पाहून कंस भयाभीत होत्साता प्रधानासीं विचार करूं लागला कीं, आमचा वैरी पृथ्वीवर अवतरला आहे, परंतु त्याचा शोध लागत नाहीं. तरी जो शोध लावून येईल, त्याची इच्छा मी पूर्ण करीन. शत्रु लहान आहे तोंच त्याचा घात केला पाहिजे. प्रधान ह्मणाला—जनवदंता अशी बोलतात कीं, वैरी गोकुळांत गौळ्यांच्या घरीं वाढत आहे. लक्षानुलक्ष गौळणी गोकुळांत बाळंतिणी आहेत, परंतु वैरी ज्या घरीं असेल, त्याचा शोध लावून कापट्यवेषानें मारून टाकावा. असें ऐकून महाबळनामक दैत्य कंसास ह्मणाला—मी ब्राह्मणवेष घेऊन गोकुळांत जाऊन पाळत करितों. असें ऐकतांच कंसानें संतोषून त्याचा मोठा गौरव केला.

त्या दैत्यानें कापट्यवेषानें ब्राह्मण बनून हातांत पंचांग घेऊन आणि गोकुळांत येऊन, कोणाच्या घरीं पुत्रसोहळा होतो, असें विचारूं लागला. लोकांनीं सांगितलें, नंदाचे घरीं श्रीकृष्ण अवतरला आहे.. मग त्या ब्राह्मणानें नंदाचे घरीं प्रवेश केला. त्याला गौळ्यांनीं नमस्कार घालून त्याचें आदरातिथ्य केलें. यशोदेनें त्याला कृष्णाचे ग्रह पाहण्यास सांगितलें. तेव्हां तो ह्मणाला—गर्गादिक गुणाकार करावयास चुकले. हा कृष्ण मुळावर उपजला आहे यास्तव हा सर्वांचें

निर्मूळण करील. याच्यापायीं गोकुळाचें निर्दालन होईल. ह्मणून याला खाड्यांत जीवंतच पुरून टाकाल तर सर्वांचें कल्याण होईल. असें सांगतांच वैकुंठपाळानें चरित्र मांडलें. तें असें कीं, बाळ बाहेर टाकावा असें महाबळभटानें सांगतांच दह्याचें मडकें येऊन त्याच्या कपाळावर आदळलें, लाटणें उभेंच तोंडांत शिरलें, घरांतील देव्हारे, पाट येऊन उरावर आपटूं लागले. पाटच्यावरवंटयांनीं पाय मोडले. पाट, चौक्या, पाहरी, घण, सांखळ्या, कुदळी, कुऱ्हाडी, गोंवऱ्या यांस जीव येऊन त्याच्यावर धांवत सुटल्या. मुसळांचे मार होऊं लागले, तेव्हां त्याचें धोतर फिटून जाऊन, पंचांग फाटलें, जानवें तुटलें, त्यामुळें तो पळूं लागला. गौळी हांसून ह्मणूं लागले आमच्या कृष्णास बोल ठेविला ह्मणूनच त्याचें फळ तात्काळ मिळालें.

इकडे तो कपटी नागवा उघडा पळत कांपत रडत कंसाजवळ आला आणि ह्मणाला—तुझा शत्रु गोकुळांत वाढतो आहे, तो धरित्री निर्वैर करील असें वाटतें. निर्जीव पदार्थांस जीव येऊन मला खूब मार बसला ! ही मानवी कळा नव्हे, तो विष्णूच अवतरला असावा. कंसा ! तुझें मरण जवळ आलें असें वाटतें. असें ऐकतांच कंसाच्या मनास दचका बसून, आतां वैऱ्यास शोधून कोण काढतो ? अशा

विचारांत आहे तों पूतना येऊन ह्मणाली–मी कपट कळा जाणतें, तुझ्या शत्रूस एका क्षणांत मारून टाकीन. मला आज्ञा द्यावी. मग कंसानें तिचा गौरव केला.

नंतर ती पूतना रंभेसारखी वस्त्रालंकारांनीं नटून गांवो-गांवींचीं बालकें गुप्तरूपानें मारूं लागली. तिला लोकांनीं पाहतांच ही लक्ष्मीच आली असा भास होई. पण तिची गुप्तगती कोणास कळत नसे. तिनें स्तनांत विष भरलें असल्यामुळें स्तन मुलाच्या मुखास लावितांच मुलें प्राण सोडित असत. अशी ती पूतना यशोदेच्या मंदिरांत आली. तिला पाहतांच यशोदेस वाटलें ही कोणी गोपी कृष्णास पाहण्यास आली असेल. तिनें कृष्णास पाहतांच तिला मोठें सुख वाटून पाळण्यांतून कृष्णास उचलून घेऊन स्तनाशीं लाविला. तोंच कृष्णानें स्तन हातांत धरून मुखांत घातला आणि एक हात तिच्या खांद्यावर ठेविला. कृष्णानें तिच्या स्तनांतील विषासह दूध शोषून टाकितांच, सर्वांगाच्या शिरांस तुंबडी लागल्यासारखें तिला होऊन नवल वाटलें व मनांत ह्मणाली–विष शोषून बाळ वांचलें कसें? मग तिचें सर्वांग कांपूं लागतांच श्रीकृष्णा! सोड सोड. मी पुनः गोकुळांत कधीं येणार नाहीं, असें बोलत मूर्च्छा येऊन पडली तरी श्रीकृष्णानें सोडिली नाहीं. तिच्या सर्व गात्रांचें शोषण होतांच

ती हरिस्मरण करित मुखाकडे पाहूं लागली व तेंच ध्यान हृदयांत धरून प्राण सोडिला. तरी श्रीकृष्णानें तिला सोडिली नाहीं. यशोदा घरांत येऊन पाहूं लागली तों भयंकर दैत्यीण पसरलीं आहे. तिला पाहतांच, यशोदा हांक फोडून धांवा धांवा ह्मणून ओरडूं लागली.

तोंच गौळी धांवत येऊन, त्यांनीं तिच्या उरावरून श्रीकृष्णास उचलून यशोदेजवळ दिलें. तेव्हां ती स्फुंदस्फुंदून रडत अनर्थ चुकला ह्मणून बोलूं लागली व आपल्या पायांची माती श्रीकृष्णाच्या कपाळास लाविली. कांहीं स्त्रियांनीं लिंबलोण करून भालदोरी रिठे गांठी दृष्टी लागूं नये ह्मणून त्याच्या गळ्यांत बांधिल्या.

अध्याय ९ वा.

बाललीला व शकटासुर तृणावर्त्तवध.

नंतर यशोदा ह्मणाली—आज अरिष्ट टाळून भगवंतानें माझें बाळ वांचाविलें. त्यावेळीं नंद घरीं नव्हता, तो राजद्रव्य देण्याकरितां मथुरेंत गेला होता. पूतनेचें असंभाव्य पसरलेलें प्रेत कोणासही उचलेना. मग तिच्या देहाचीं कुऱ्हा-

डीनें खंडें करून, तीं गांवाबाहेर नेऊन त्यास अग्नि दिला. त्यावेळीं तिच्या अंगच्या सुवासानें घ्राणदेवता संतुष्ट झाल्या. याचें कारण तिच्या शरिरांत अंतर्बाह्य श्रीकृष्ण भरल्यामुळें अग्निसंगानें सुवास सुटला, त्यामुळें गोकुळांतील जन तटस्थ झाले. इतक्यांत नंद मथुरेहून आला. त्यास वर्तमान कळतांच तो सद्गदित होत्साता घरीं येऊन कृष्णास उचलून आलिंगन देता झाला. मग विघ्न चुकलें ह्मणून मंडप उभारून गाई, भूमी, सुवर्ण, अन्नदान यांचा उत्सव केला.

पूतना मेल्याची बातमी कंसास कळतांच त्याचें मन दचकून भयानें व्यापून गेलें व विचारांत पडला. इकडे गोकुळांत नंदमंदिरांत श्रीहरीस माजघरांत निजविला असतां तो कुशीवर कलथून रांगावयास आरंभ करूं लागला. त्यावेळीं नंदानें उत्सव करून ब्राह्मणांस वस्त्रें व भूषणें वाटलीं. एके दिवशीं प्रातःकाळीं श्रीकृष्णास सूर्यदर्शन करविण्यासाठीं यशोदेनें आंगण्यांत निजवून, पोटावर वस्त्र झांकून आपण घरांत गेली व नंदही बाहेर गेला होता. श्रीकृष्ण आंगण्यांत एकटाच होता.

अशा संधींत कंसानें पाठविलेला शटकासुर गुप्तरूपानें आंगण्यांत येऊन गाडा होऊन श्रीकृष्णाच्या अंगावर लोटला. तोंच जसें पर्वतावर वज्र पडतांच त्याचें चूर्ण होतें

त्याप्रमाणें श्रीकृष्णानें चरण झाडतांच त्या दैत्याचें चूर्ण केलें. जसा पूर्वी अहिल्योद्धार झाला तसा गाड्याचा चूर होऊन पडला, तोंच माया बाहेर आली व नंदही बाहेरून आला. त्यांनीं व गौळ्यांनीं गाड्याचें झालेलें चूर्ण पाहतांच आश्चर्य मानिलें. ते ह्मणूं लागले हा गाडा येथें कोणी आणिला ? जर बाळावर लोटता तर कांहीं उरी उरली नसती. मग नंद यशोदेस ह्मणाला—कृष्णावर विघ्नें फार येतात यास्तव याला अहोरात्रीं क्षणभर विसंबूं नको. तें ऐकून यशोदेस सुख वाटलें. परंतु गाड्याचें चूर्ण झालें ती हरीची लीला कोणास कळली नाहीं. पुढें श्रीकृष्ण आंगण्यांत हळु हळु रांगूं लागतांच, बळरामही खेळावयास येऊं लागला. एक गोरा व एक सांवळा असे दोघे खेळत असतां धूळ अंगावर व जायबळांत घालून घेऊं लागले. यशोदा व रोहिणी पाहावयास येतांच दोहींकडे दोघे पळत असत. श्रीकृष्ण आईचे गुडघ्यांस मिठी मारून वर तोंड करून गदगदां हांसत असे; त्यास यशोदा चुंबन देई. मग दोघांस घरांत नेऊन सोडतांच गौळणी खेळावयास येत. पुढें एकमेकांचा हात धरून उभे राहतां राहतां, दुडदुडां धांवूं लागले. त्यांची नृत्यकला पाहून गौळणी विस्मित होत व टाळ्या वाजवून कृष्णा नाचरे नाच असें ह्मणत असत. श्रीकृष्णानें नृत्याची विचित्र कला दाख-

वितांच नंद, यशोदा, गौळणीही नाचूं लागून पृथ्वी, उखळें जातीं, मुसळें आदिकरून निर्जीव पदार्थ नाचत असत.

एकदां शेष आणि नारायण आंगण्यांतून धांवत येऊन यशोदेच्या गळ्यास मिठी मारिली. तेव्हां बळराम माझी माय ह्मणाला. कृष्ण ह्मणूं लागला माझी माय ! बळराम पुनः ह्मणाला माझी माय, तेव्हां श्रीकृष्ण लोळणी घेऊन रडूं लागला. मग यशोदेनें मी तुझीच माय असें बोलून त्याची समजूत केली. एके दिवशीं दोघे खेळत असतां श्रीकृष्ण बळरामास ह्मणाला—आपण पक्षी धरून आणूं चला. असें बोलून पक्ष्यांच्या पाठीस लागत, तों पक्षी उडून जातांच, वर नेत्र लावून श्रीकृष्ण ह्मणाला—मी आकाशांत उडेन. बलराम ह्मणाला—मी पृथ्वी उचलीन. अशा अनेक बाललीला दाखवित असत. श्रीकृष्ण तान्हीं बांसरें सोडून लावी, तीं जशा उड्या मारित तशा आपणही दोघे नाचत असत. लहान लहान गोपाळ जमवून त्यांच्याबरोबर अनेक प्रकारचे खेळ खेळत असत.

इकडे कंस मथुरेंत चिंताक्रांत असतां, तृणावर्त ह्मणाला—मी आकाशांत वायुरूपानें जाऊन, तुझ्या शत्रूस अकस्मात् उचलून आणीन. मग कंसानें त्याचा गौरव करितांच, तृणावर्त वायुरूपानें गोकुळाजवळ आला; तों प्रचंड वायु वाहूं

लागला. त्यावेळीं यशोदा श्रीकृष्णास कडेवर घेऊन आंगण्यांत गौळणीशीं बोलत होती. श्रीकृष्ण तृणावर्त आला असें जाणून, आईच्या कडेवर जड झाला; तोंच यशोदेनें खालीं उतरतांच, दुड दुड धांवत बाहेर आला. त्या प्रचंड वाऱ्यानें धुळीनें दिशा धुंद होऊन कोणी कोणास दिसेनासें झालें; वृक्ष, घरें उडून जाऊं लागलीं. त्या संधींत तृणावर्तानें हरीस उचलून आकाशांत नेलें. तोंच श्रीहरीनें अद्भुत रूप प्रगट करून तृणावर्ताची मान पिळून टाकिली. तेव्हां त्याचें प्रेत गोकुळांतील अरण्यांत जाऊन पडलें. मग श्रीकृष्ण गोकुळांत येण्यास परतला.

वारा बंद होतांच, लोक सावध झाले व यशोदा श्रीकृष्णास आळोआळीं शोधूं लागली. यशोदे भोंवतीं गौळणी जमा झाल्या, सर्व लोक शोकांत बुडाले, तोंच श्रीकृष्ण दुडदुड धांवत येतांना दृष्टीस पडला. त्याला यशोदेनें उचलून घेतला. नंदास आनंद होऊन त्यानें अपार दानें वाटलीं व श्रीकृष्णास विसंबूं नको असें यशोदेस सांगितलें. कंसाला तृणावर्त मेल्याची बातमी कळतांच, तो वणव्यांतील सर्पाप्रमाणें अहाळून जाऊन चिंताक्रांत बसला.

इकडे गोकुळांत यशोदा श्रीकृष्णास स्तनपान करवीत, कानामागील मळी काढित असतां, श्रीहरीनें जांभई देऊन

मुखांत ब्रह्मांडरचना व कृष्णाच्या असंख्य मूर्ती, गोकुळवासी जन, स्तनपान करित असतां जांभई देणें इत्यादि प्रकार यशोदेस दाखविले; ते पाहतांच यशोदा बोलणें चालणें विसरून तटस्थ झाली. अशा प्रकारें विश्वरूप दाखवून तें पुनः गुप्त केलें. नंतर यशोदा श्रीकृष्णास पाळण्यांत निजवून श्रीरामचरित्राचें गाणें गाऊं लागली. तें श्रीकृष्ण पाळण्यांतून ऐकत होता. शेवटीं रावणानें कपटानें जानकीचें हरण केलें, असें गाण्यांत गातांच, श्रीहरीनें गर्जना करून पाळण्यांतून खालीं उडी टाकिली आणि तेथेंच धनुष्यबाण युक्त रघुनंदन उभा राहिला. त्यानें आकर्ण चाप ओढून ह्मटलें—रावण कोठें आहे तो मला दाखवा, त्याला क्षणार्धांत छेदून टाकितों.

असें पाहतांच यशोदा भयाभीत होऊन तटस्थ झाली आणि एकाएकीं रघुनाथ प्रगट कसा झाला असें बोलूं लागली. असें यादवरायानें आईस कौतुक दाखविलें. यशोदा पाळण्यांत पाहते तों श्रीकृष्ण रडत आहे, असें पाहून यशोदेस नवल वाटलें. ती ह्मणाली—मी हें स्वप्न पाहिलें कीं काय ? अशी हरीची लीला अद्भुत होय. एकदां श्रीकृष्ण आईस ह्मणाला—आई ! मला कडेवर घेऊन आंगण्यांत चाल, मी तेथें घटकाभर खेळेन. मग आईनें नीलवंद भूमीवर आंग-

ण्यांत नेऊन बसविला. तों भूमीचें व कृष्णाचें एकरूप होऊन तो दिसेनासा झाला. तेव्हां यशोदा घाबरून कृष्णाकरितां सर्व गोकुळ धुंडलें आणि हृदय पिटून आतां मी काय करूं ? पृथ्वींत अदृश्य झाला किंवा गंधर्वांनीं उचलून नेला ! असा अपार शोक करूं लागली. श्रीकृष्ण आंगणांत असून तिला दिसला नाहीं. याचप्रकारें जन भुलून नाना साधनें करितात.

जगज्जीवन जवळ असून, कित्येक अरण्यांत वास करितात, निराहार राहतात, पंचाग्नी साधनें करितात, नाना यज्ञ, वायु आहार, नग्नी, मौनी, जटाधारी, दिगंबर होऊन फिरतात; परंतु त्यांना निधान सांपडत नाहीं. श्रीरंगाची कृपा नसेल तर सर्व साधनें व्यर्थ जाणावीं. जगज्जीवन आंगण्यांत असून गोपी भुलून गेल्या. मृगनाभींत कस्तुरी असून, तिचें ज्ञान त्यास नसणें, नाकांतलें मोतीं गळ्यांत घालून केरांत शोधणें; तशीं यशोदेनें सर्व ठिकाणें शोधिलीं. नंद आंगणांत आला. शोधतीं गौळणी रडूं लागल्या; असें कृष्णानें पाहून माया आतां प्राण देईल असें जाणून, नीलबंद भूमींतून दुडदुड धांवत आला. त्याला नंदानें पाहतांच उचलून घेतला, गौळणी धांवत आल्या, यशोदेस पान्हा फुटला; मग तिनें स्तनपान करवून बाळा ! कोठें गेला होतास ह्मणून विचारलें. श्रीकृष्ण ह्मणाला—आई ! मी येथें आंगण्यांतच खेळत

होतों. तें ऐकून यशोदेस आनंदाश्चर्य वाटून, तिनें घरांत नेऊन हृदयपाळण्यांत निजविला.

अध्याय ६ वा.

श्रीकृष्णाच्या बाललीला व गौळणींचीं गाऱ्हाणीं.

एके दिवशीं कृष्णानें प्रातःकाळींच आळी घेतली कीं, आई मला खेळावयास सूर्य काढून दे. असें बोलून लोळणी घेतली. मग आईनें कडेवर घेऊन ह्मटलें—माझे आई कान्हाई! सूर्य तुला कसा देऊं? दुसरें कांहीं माग. "मग रांजणांतील चंद्रबिंब, डेऱ्यांत घुमतें तें, पर्वत, देव्हाऱ्यांतील देव, डोळ्यांतील बाहुली, आरशांतील मुख, मोत्यांचा ढाळ, घटांतील आकाश इत्यादि मागून लोळूं लागला. तेव्हां माता ह्मणाली—बाळा रडूं नको, बाहेर पांच मुखांचा बागुल आला आहे. असें ऐकतांच कृष्ण ह्मणाला—आई! मला तोच दाखीव, ह्मणून हट्ट धरून बसला. तेव्हां यशोदा पुष्कळ प्रकारें समजावूं लागली तरी समजेना. नंतर तळघरांत अंधारांत घेऊन गेली. तेथें श्रीहरीनें मायेवर माया घालतांच यशोदा आप-

गास विसरून गेली. मग नसती आळ घेऊं नको ह्मणून सांगूं लागली; तोंच बलराम येऊन कृष्णास ह्मणाला-- गोपाळा ! बाहेर खेळावयास चल. तेव्हां कडेवरून खालीं उतरून बलरामाचा हात धरून दोघे दुडदुडां धांवत रस्त्यावर आले. त्यांस लहान लहान गोपाळ येऊन मिळाले.

श्रीहरी गोपाळांसह खेळ खेळल्यावर एका गोपीच्या घरांत शिरून दहीं दूध भक्षण केलें व तूप, लोणी, साय गोपाळांस दिली. तेथून दुसरीच्या घरीं जातांच श्रीकृष्ण गड्यांस ह्मणाला-सखे हो ! पाउलें वाजवूं नका, नाहींतर आवाज ऐकून गोपिका जाग्या होतील. गडी ह्मणाले-तुझ्याच पायांतील वाळे नेपुरें यांचा आवाज होतो तो आवरून धर. असें ऐकून कृष्णानें कानांत बोटें घातलीं आणि त्या गोपीचें घृत लोणी सर्व भक्षण केलें. अशी त्याची अगम्य लीला कोणासही कळत नसे.

एके दिवशीं एक गौळण दुपारचे वेळीं यमुनेवर पाणी आणण्याकरितां गेली होती. तिच्या मंदिरांत श्रीकृष्ण एकटाच जाऊन लोणी भक्षण करित होता तोंच ती गौळण घरीं आली. ती कृष्णास ह्मणाली-तूं कोणरे येथें चोरून लोणी खातोस ? कृष्ण बोलला-तूंच चोरटी आहेस, माझें लोणी मी खात आहें, तूं मला विचारणारीण कोण ? तेव्हां ती

हांसून ह्मणाली—चोरट्या, हें घर माझें आहे. कृष्ण तिला ह्मणाला—अगे ! माझें घर ह्मणतेस याचा विचार कर. शरीर आपलें नव्हे मग घरदार कोणाचें ? असें ऐकतांच गोपीनें विचार करून ह्मटलें—गोपाळा ! घर माझें नव्हे हें मला कळलें, तर मग तें कोणाचें सांग पाहूं ? श्रीहरी ह्मणाला—हें घर माझें आहे. गोपी ह्मणाली—तुझें घर ह्मणतोस तर मग कांहीं खूण सांग पाहूं ? कृष्ण बोलला—आकाशानें जितकीं घरें व्यापिलीं आहेत तीं सर्व माझीं आहेत. ती ह्मणाली—तूं बरी संपादणी करितोस ? अरे ! त्या तुपाच्या भांड्यांत हात कां घातला आहेस ? कृष्णानें सांगितलें—आंत मुंग्या पडल्या आहेत त्या वेंचून टाकितों आहें. मग गोपी ह्मणाली—निजलेलीं मुलें चिमटे घेऊन कां उठवितोस ? कृष्ण बोलला—उद्यां गाई कोणत्या वनांत न्यावयाच्या तें विचारण्याकरितां जागें करितों. असें बोलून तेथून पळून गेला.

नंतर गौळणी यशोदेजवळ गाऱ्हाणीं सांगावयास आल्या. एक ह्मणाली—कृष्ण माझ्या घरांत शिरून, उंच टांगलेलीं शिंकीं हातीं लागत ना तेव्हां पाटावर पाट रचून त्यांवर तिवई ठेवून तिच्यावर गडी उभा केला; त्याच्या खांद्यावर कृष्ण बसला, तरी शिंकें हातीं लागेना तेव्हां रवीचे दांडीनें

घागरीस भोंक पाडून खालीं अखंड धार लावून, माझ्या कोंपराच्या धारा प्राशन करा; असें गड्यांस सांगूं लागला. ज्याच्या खांद्यावर श्रीकृष्ण बसला होता तो हरीच्या पायांस चिमटे घेऊन तूंच गोरस खातोस काय ? असें बोलतांच, ओंजळ भरून, गोरस त्यास पाजला. त्याचवेळीं गौळण जागी झाली तेव्हां गड्यांस पळावयास सांगितलें. त्याप्रमाणें ते पळून गेले. एकटा श्रीकृष्ण सांपडला त्यास दारांत अडवून धरिला आणि ह्मणाली—अरे चोरा ! गड्यांस पळवून लाविलेंस ? आतां तूं कोठें जाशील पहातें. तूं मुख्य सांपडलास आतां दुसऱ्याचें काय काम ! तुला यशोदेजवळ नेऊन शिक्षाच लाविते. असें गौळण बोलतांच कृष्ण हांसून, दुग्ध-गुळणी मुखांत घेऊन तिच्या जवळ आला आणि डोळ्यांत गुळणी टाकतांच ती आपले डोळे चोळूं लागली -तोंच तेथून पळून गेला.

दुसरी ह्मणाली—परवां मी मंथन करित असतां श्रीहरी आंगण्यांत येऊन उभा राहिला. त्याला मी ह्मणालें—येथें काय पाहतोस ? तो ह्मणाला—मी वांसरें पाहण्यास आलों आहें. त्यावेळीं गोठ्यांत तान्हीं वांसरें बांधिलीं होतीं तेथें जाऊन त्यांस कुरवाळूं लागला, आणि हें वांसरूं कोणत्या गाईचें असें मला विचारूं लागला. नंतर त्यानें तीं सर्व वांसरें

सोडून लावून मला येऊन ह्मणाला—तुझीं वांसरें रानात पळून गेलीं. तेव्हां मी मंथन टाकून तसेंच निघालें. इकडे कृष्णानें गोरस भक्षण करून डेरा व दुधाणी फोडून टाकिलीं व आपण पळून गेला. मी तिसरे प्रहरीं येऊन पाहतें तों सर्व खापरांचा चुराडा होऊन पडला आहे. माये ! अशी यानें पीडा दिली आहे. आतां मी याचे पायच बांधून ठेवीन. असें ऐकून श्रीहरी हांसून ह्मणाला—मी ब्रह्मादिकांस सांपडलों नाहीं तेथें तुझी शक्ति काय ? हें कृष्णाचें वचन ऐकून माय हांसूं लागली. तों तिसरी गौळण गाऱ्हाणें सांगावयास आली.

ती ह्मणाली—माये ! एका गौळणीची सून एकटीच घरीं असतां, घरांत प्रवेश करून तूप, लोणी भक्षण करून थोडें सुनेच्या तोंडास फांसून पळाला. तोंच सासु बाहेरून घरांत आली; तिनें सुनेचें तोंड पाहतांच तिला ह्मणाली—चोरटे ! तूंच नेहमीं लोणी भक्षण करतेस. मी कृष्णावर उगाच आळ घालित होतें. असें बोलून तिच्या झिपऱ्या धरिल्या; ती गंमत कृष्ण दुरून पाहात होता. सून ह्मणाली—मामिसें ! कृष्ण माझ्या मुखास लोणी फांसून पळाला. मग गौळण बाहेर पाहूं लागली तों कृष्ण उभा होता, त्याला बोलली—अरे ! माझ्या सुनेच्या मुखास लोणी फांसून पळालास काय ? श्रीकृष्ण ह्मणाला—तींच लोणी खात होती, मी आंगण्यांत

खेळत असतां, तिनें धांवत येऊन माझ्या तोंडास लोणी फांसलें. हें कृष्णाचें वचन तिला खरें वाटून, पुनः सुनेवर कोपून तूंच चोरटी कपटी आहेस असें ह्मटलें. अशी कळ लावून कृष्ण पळून गेला. नंतर आणखी एक गौळण गाऱ्हाणें सांगावयास आली.

गौळण ह्मणाली—परवां कृष्ण रस्त्यावर खेळत असतां, एका गोपीस विचारूं लागला—तुझ्या उरावर हिंगुरडें कां वाढलीं ? किंवा आमचे चेंडू चोळींत चोरून ठेविले आहेस ? ते लौकर दे अशी आळ घेतली. त्यावेळीं तिनें झिडकारतांच पळून गेला. एकीच्या घरचा सर्व गोरस खाऊन शिंकीं आणि रिकामीं दुधाणीं शेजारणीच्या घरीं नेऊन ठेविलीं. तेव्हां त्या बाईनें शेजारणीबरोबर भांडण करून, दोघींची झोटधरणी झाली.

एका गौळणीची सून परसांत नग्न अंग धूत असतां, घरांत शिरून ह्मणूं लागला कीं, आमचा चेंडू उडून परसांत आला आहे, असें बोलून त्या स्त्रीजवळ जाऊन तिचा हात धरून ह्मणाला—चोरटे ! ऊठ वर, आमचा चेंडू उराजवळ धरून बसली आहेस तो लौकर दे, नाहींतर शिक्षा लावीन. असें बोलतांच ह्मातारी धरावयास धांवली, तोंच तेथून पळून गेला. एक गोपी कृष्णास ह्मणाली—जर तूं आमच्या घरास

येशील तर तुला खांबासीं बांधून ठेवीन. तो डाव मनांत धरून रात्रीं तिच्या घरांत जाऊन वस्त्रांत विंचू सोडून दिले. तेव्हां ती गौळण वस्त्र टाकून नग्न होऊन घाबरी झाली. तोंच कृष्ण तेथें येऊन काय झालें ह्मणून विचारूं लागला. ती ह्मणाली–वस्त्रांत विंचू शिरून त्यानें दंश केला. कृष्ण बोलला–तूं मला खांबासीं बांधीन ह्मणत होतीस ना ? त्याची प्रचिती तुला देवानें दाखविली. तरी आतां तूं रस्त्यावर नग्न होऊन येशील तर तुझा विंचुदंश उतरून टाकीन. मग ती काकुळतीस येतांच, तिच्या वेदना उतरून टाकिल्या.

अशा प्रकारचीं अनेक हरिचरित्रें गौळणी यशोदेजवळ सांगूं लागल्या. त्यांतलि एक गौळण ह्मणाली–यानें सर्प नेऊन दोघें नवरा बायको निजलीं असतां, त्यांत सोडिला. तेव्हां तीं बाहेर येऊन लोकांस सांगूं लागलीं. तें ऐकून एक मनुष्य ह्मणाला–ही कृष्णाचीच करणी असावी; तो मघां सर्प घेऊन फिरत होता. एक गौळण गरोदर पाहून, तिच्या जवळ जाऊन ह्मणाला–अगे ! तुझें पोट एवढें मोठें वाढलें कां ? ती ह्मणाली–मी गर्भिणी आहें ! कृष्ण बोलला–तूं गर्भिणी कशी झालीस ? मग तिनें त्यास झिडकारून टाकिलें.

एक गौळण पुरुषार्थानें ह्मणाली–मी एक बिंदुमात्र गोरस कृष्णास लाभूं देणार नाहीं. मग तिनें कावडी भरून बंदोब-

स्तानें बांधून दुसरे दिवशीं मथुरेस नेण्याकरितां तयार करून उशाजवळ ठेविल्या. तेव्हां त्याच रात्रीं कृष्ण तिच्या घरांत शिरून, ती निद्रिस्त असतां, त्या कावडी सोडून सर्व गोरस भक्षण करून, दुधाणीं रिकामीं केलीं व त्यांत सर्प, विंचु, सरडे, पाली, बेडूक भरून जशाच्या तशा बांधून ठेविल्या. ती गौळण प्रातःकालींच उठून कावडी घेऊन मथुरा बाजारांत जाऊन बसली. तेथें गिराईक येतांच, तिनें कावडी सोडिल्या तोंच भांड्यांतून सर्प विंचु आदिकरून लोकांच्या अंगावर धांवून दंश करूं लागले. तेव्हां सर्व त्या गौळणीस मारावयास धांवले; तोंच ती भीतीनें धांपा टाकित गोकुळांत पळत आली. त्या दिवसापासून तिला मथुरा वर्ज झाली. तिनें जर कृष्णास गोरस दिला असता तर तो शंभर पटीनें वाढला असता. अशी ती गौळण प्रपंच परमार्थास मुकून भवसागरांत पडली. मग ती गौळण यशोदेच्या घरीं येऊन कृष्णास शरण आली.

अध्याय ७ वा.

श्रीकृष्णाच्या बाललीला व गौळणींचीं गाऱ्हाणीं.

एके दिवशीं एका गौळ्यानें आपल्या बायकोस सांगितलें

कीं, भगवंताचा नवस पुरविण्याचा आहे तरी दहीं दूध तूप सांठवून ठेव. मग त्या स्त्रीनें तूप पुष्कळ सांठलेलें पाहून त्यांतील अर्धें तूप शेजारणीच्या घरीं नेऊन ठेविलें. गौळ्यानें श्रीहरीचा नवस फेडला परंतु शेजारणीकडे चोरून ठेवलेलें तूप तसेंच राहिलें. असें श्रीकृष्णानें जाणून ती गौळण बाहेर गेली असतां तो घट पळवून सर्व मुलांस वांटला आणि आईजवळ गेला. त्याचें यशोदेनें चुंबन घेऊन अंगास तूप माखलेलें पाहून ह्मटलें–बाळा ! तूं कोठें गेला होतास ? आतां गौळणी गाऱ्हाणीं सांगावयास येतील.

इकडे ती गौळण शेजारणीकडे घृतघट मागावयास गेली तों ठेविल्या ठिकाणीं घट नाहीं. मग त्या दोघींचें भांडण लागलें. परंतु ही गोष्ट भ्रतारास कळेल ह्मणून ती गौळण कृष्णार्पण झालें असें बोलून उगाच राहिली. दुसरें एक गौळ्याचें जोडपें गोरसाची राखण करित असतां, तेथें कृष्णानें कौतुक केलें; तें असें कीं, तीं निद्रिस्त असतां, दोघांच्या मध्यें एक मुंगूस नेऊन सोडलें आणि गोरस भक्षून पळून गेला. तें मुंगूस दोघांच्यामध्यें उकरूं लागलें, तेव्हां तीं घाबरून वस्त्र न सांवरतां भूत उरावर बसलें ह्मणून ओरडत बाहेर आलीं. तोंच लोक जमून दिवे लाविले. पण आंत कोणाच्यानें जाववेना. मग धीट होते ते

आंत गेले तों मुंगूस आढळलें. त्यास पाहतांच, सर्व गदगदां हांसूं लागले. एक ह्मणाला—आज सकाळीं कृष्ण एक मुंगूस घेऊन आळोआळीं फिरत होता, त्यानेंच हें सोडलें असेल. असें बोलून घरोघर गेले. सकाळीं ती गौळण यशोदेजवळ जाऊन सांगूं लागली, तें ऐकून यशोदाही हासूं लागली.

एक गौळण कृष्णास ह्मणाली-तूं माझ्या घरीं येशील तर तुला खांबासीं बांधून ठेवीन. कृष्ण ह्मणाला—आतांच बांध पाहूं ? मग ती घरीं गेली. त्याच रात्रीं ती गौळण भ्रतारासह निजली असतां, त्यांच्या दाढी वेणीस गांठ मारून, गोरस भक्षून निघून गेला. प्रातःकाळ होतांच गौळण धार काढावयास उठूं लागली, तों वेणीस ओढा लागतांच ह्मणाली—कांहीं तरी लाज धरा, मी धार काढावयास जातें, माझी वेणी सोडा. अजून इच्छा पुरी झाली नाहीं ? सूर्य उदय झाला ना ? मग त्याच्या दाढीस आंचका बसतांच, तो जागा होऊन तिला ह्मणाला—अझून तुझें मन धालें नाहीं, माझी दाढी सोड आणि धार काढावयास जा.

अशी त्यांची ओढाताण होऊन एकमेकांस तीक्ष्ण शब्दांनीं बोलूं लागलीं, व गांठ मी मारली नाहीं ह्मणून अनेक शपथा घेऊं लागलीं. त्यांनीं गांठ सोडण्याचा प्रयत्न केला पण ती कांहीं केल्या सुटेना, शस्त्रानें कापेना व अग्नी-

नेंही जळेना. मग तीं तशींच रस्त्यावर आलीं. तेथें व्याही, जांवई, दुर्जन आदिकरून जमा झाले. ते खदखदां हांसूं लागले. नंद गांठ कोणी मारिली ह्मणून विचारूं लागला. तेव्हां तीं गर्हिवरून नकळे ईश्वराची करणी ! असें बोलूं लागलीं. तोंच कृष्ण खदखदां हांसून ह्मणाला–तूंच ना काल माझी शेंडी धरून बांधीत होतीस ? त्याची प्रचीति तुला देवानें दाखविली. नंतर कृष्णानें कृपादृष्टी करितांच गांठ सुटली. मग तीं कृष्णास नमस्कार करून घरीं गेलीं.

एके दिवशीं कृष्ण एका गौळणीपुढें नेत्र चोळीत ह्मणाला–अगे ! माझे डोळे दुखत आहेत तरीं जी पुत्राची माता असेल तिचें दूध डोळ्यांत घातलें पाहिजे. ती ह्मणाली–माझ्या स्तनांतील दूध घेऊन जा. श्रीहरी बोलला–तसें दूध कामीं येणार नाहीं; तूं मागशील तें देईन परंतु मी आपल्या हातानें तुझे स्तन पिळून दूध डोळ्यांत घालतों. असें ऐकतांच, ऊठ येथून चावटा असें बोलून ती त्याच्या पाठीस लागली, तोंच तो पळून गेला.

एकदां कृष्ण खेळावयास गेला असतां, गोपाळांस ह्मणाला–तुमच्या आई बाहेर गेल्या मग मला सांगा ह्मणजे त्याच घरीं आपण जाऊं. ज्याघरीं गोरस मिळत नसे त्यांच्या पोरांस मारित असे. वांसरांच्या शेंपटास पोरांस बांधून आळोआळीं पिटी; तीं मुलें आक्रोशानें रडत असत. तीं

गाऱ्हाणीं गौळणी यशोदेशीं सांगत. एक गौळण यमुनेवरून घागर भरून चालली असतां, गोपाळांसह कृष्ण पुढें जाऊन तिची निरी धरून आसडली, तोंच ती नग्न होऊन वस्त्र जमिनीवर पडलें. तिचे हात घागरीस गुंतल्यामुळें कृष्ण तिचें वस्त्र घेऊन पळाला. मग ती नग्नच घरीं आली; तिच्या मागें पोरें लागून त्यांनीं गोंगाट केला. तें गाऱ्हाणें यशोदेस सांगितलें. एक तरुणी पाणी भरित असतां, तिचे मागून येऊन नेत्र झांकले व आपण अदृश्य झाला. अशीं अनेक गाऱ्हाणीं ऐकून यशोदा कृष्णास ह्मणाली—बाळा ! तुझ्या या खोडीस मी काय करूं ? कृष्ण बोलला—आई ! या गौळणी असत्य बोलतात. मला या घरीं नेऊन कुचेष्टा शिकवितात, हृदयाशीं धरितात, माझे ओंठ चावून चुंबनें घेतात, त्या धमकटी मला कष्ट देतात, पुष्कळ जणी मिळून घरांत नागव्या होऊन माझ्या भोंवतीं नाचतात. मोठा असतास तर बरें झालें असतें, हें त्यांचें बोलणें तुझेजवळ सांगेन असें बोलतांच, मलाच दाबतात.

श्रीहरीचें भाषण ऐकून गोपी लटकाच क्रोध आणून बोलल्या—यशोदाबाई ! तुह्मांला आपल्या पुत्राच्या बोलण्याचें कौतुक वाटतें; परंतु हा परम नष्ट व अनाचारी आहे. नाहीं नाहीं तेच आळ आमचेवर घेतो; हा पुढें पुष्कळांचीं घरें बुड-

वील. हांसतां हांसतां हा ब्रह्मांड कांखेंत लपवील. एका क्षणांत सातसमुद्र नखाग्रांत जिरवील, याची एकेक गोष्ट लिहिली असतां धरणीही पुरणार नाहीं. हा काल आमच्या मंदिरांत आला होता, त्याला आह्मीं विचारलें–श्रीपती ! तुला नवरी कशी पाहिजे ? तेव्हां ह्मणाला–जिच्या इच्छामात्रें करून, अनंत ब्रह्मांडाच्या गती होतात, जी परब्रह्माची मूळ स्फूर्ती; ब्रह्मा, विष्णु, महेश, सूर्य, इंद्र आदिकरून बाहुलीं जी एकाच सूत्रानें नाचविते, विश्वरूप दाखवून नाचविते, ती नोवरी मला भेटेल तरच मी विवाह करीन. तीच पतिव्रता मला नांवरूपास आ-णील, तिनेंच माझी योगनिद्रा मोडून जागवून, माझ्या सत्तेनें खेळ खेळते; परंतु मी तिला जाणत नाहीं. अशा लबाड गोष्टींची रचना तुझा कुमार करितो.

नंतर दुसरी गौळण ह्मणाली–काल कृष्ण माझ्या मंदिरांत आला, त्याला माझीं शिंकीं मी लपवून ठेविलीं असल्यामुळें दिसलीं नाहींत. तेव्हां मला ह्मणाला–जेव्हां शंखासुर समुद्रांत वेद घेऊन पळाला तेव्हां मी मत्स्य अवतार घेऊन त्या दैत्याचा नाश करून चार वेद प्रगट केले, त्या मजपुढें दहीं दूध लोणी कोठें लपवाल ? तिसरी गौळण ह्मणाली–मी दहिमंथन करित असतां, मला येऊन ह्मणाला–अशा प्रकारचें मंथन माझ्या कामास येत नाहीं. मी कूर्मावतार घेऊन, मंदराचळाची रवी व

वासुकीची दोरी केली. ती एका बाजूस देवांनीं व एका बाजूस राक्षसांनीं धरली होती, त्यावेळीं मंदराचळ पाताळांत जाऊं लागतांच, मी पर्वत पाठीवर उचलून धरिला, मग समुद्र मंथन करून त्यांतून चौदा रत्नें हेंच नवनीत काढलें. जसें तुह्मीं मुलांस दूध पाजतां तसें मी देवांस अमृत पाजलें; तेव्हां मीच मोहिनीचें रूप घेतलें होतें.

नंतर तीच गौळण ह्मणाली—मी एकदां यमुनेवर पाणी भरून घागर उचलित असतां मला ह्मणाला—अग तुह्मां गौळणीला घागरही उचलत नाहीं ? मी वराह अवतार घेऊन पृथ्वी दाढेवर धरिली ! हिरण्याक्षाचा प्राण घेतला. तुह्मीं फळें कांकड्या चिरतां त्याप्रमाणें मी नारसिंह अवतार घेऊन हिरण्यकश्यपू चिरून टाकला व माझ्या प्रल्हाद भक्ताचें रक्षण केलें. मी आपल्या पतीचे पाय धूत असतां, मला ह्मणाला—असेच बळीनें माझे पाय धुवून मला त्रिपाद भूमीदान दिलें. त्यावेळीं मी विराटरूप घेऊन त्यास पाताळांत घातला; त्याचा अद्याप मी द्वारपाळ आहें. मीच परशुराम अवतार घेऊन एकविस वेळ निःक्षत्रिय पृथ्वी केली; रामावतार घेऊन रावणास वधून तेतिस कोटी देवांची बंदमुक्तता केली. तोच हा मी गोकुळांत अवतरलों आहें. मीच कंस, चाणूर, अघासुर, मुष्टिक इत्यादिकांचा नाश करीन.

सोळा हजार स्त्रिया वरीन. दुष्टांचें निर्दालन व भक्तांचें रक्षण करीन. पुढें कल्की अवतार घेऊन म्लेंच्छांचा संहार करीन. माझ्या अवतारांची शेषालाही गणती नाहीं.

तीच गौळण आणखी ह्मणाली-यशोदाबाई ! हरी हा मोठा नाटकी असून अचाट गोष्टी सांगतो व पूर्वी अवतार झाले ते आपल्याच अंगास लावितो. हा जें बोलतो तेवढें सर्व खोटें होय. रांजणांतील पाणी पाहून ज्याला भय वाटतें तो मळयसमुद्रांत मच्छ कसा झाला ? निजतांना पाठ हळूच थोपटा ह्मणणारा त्यानें पाठीवर मंदराचळ कसा धरिला ? याला चेंडू उचलत नाहीं, आणि ह्मणतो—मी दाढेवर पृथ्वी धरिली ! आंगड्याचा बंद सोडतांना नखें दुखतात, त्यानें नखांनीं दैत्य कसा चिरला ? ज्याला ऊंस मोडत नाहीं तो ह्मणतो मी परशुरामाचें धनुष्य मोडलें ! जो बागुलाच्या भीतीनें पळतो तो रावणास कसा मारणार ? आणि आतां ह्मणतो—कंसास मारीन. उडत उडत माशासारखा होऊन असा मी मच्छावतार झालों ! पोराचा पाय धरून हाच मी संकासूर ! चक्राकार फिरून असा मंदराचळ घुमविला ! खडे दाखवून रत्नें काढिलीं ! दांतांत काडी धरून वस्त्रघडी त्यावर ठेवून डुकरासारखा रांगून अशी मी पृथ्वी धरिली ! बाहुल्यांचें पोट फोडून दाखवून अशीं हिरण्यकश्यपाचीं

आंतडीं काढिलीं ! गुडघे टेंकून वामन होऊन त्रिपाद भूमीदान केलें ! एका पोरावर उभा राहून असा बळीस पाताळीं घातला ! हातांत चेंडू घेऊन हाच माझा फरश ! यानें निःक्षत्रिय पृथ्वी केली ! चुईचें धनुष्य करून आकर्ण ओढी ओढून राक्षसास मारलें ! असे अनेक प्रकार दाखवितो. घडीभर मुरली वाजवून सुंदर गाणें गातो. याची एकही गोष्ट खरी नाहीं. असा हा चक्रचाळक आहे, त्याच्या भीतीनें गोकूळ टाकून जावें असें वाटतें. अशीं गाऱ्हाणीं ऐकून यशोदा कृष्णास ह्मणाली–अनंता ! तुझ्या खोडी मी किती सोसूं ? नंतर श्रीहरीनें परघरीं मी चोरी करणार नाहीं अशी आण वाहिली.

अध्याय ८ वा.

श्रीकृष्णाच्या बाललीला व राधाविलास.

गौळणी यशोदेस ह्मणाल्या–यशोदाबाई ! तुह्मीं संकष्टचतुर्थीचें व्रत करा ह्मणजे गणपती तुमच्या कृष्णास उत्तम गुण देईल. मग यशोदेनें गणपतीस नवस केला कीं, माझ्या मुकुंदास चांगले गुण दे मी तुझें संकष्टचतुर्थीचें व्रत करीन. असें ऐकून कृष्णानें गणपतीस सत्य करण्याकरितां एक महिना

खोडी केल्या नाहींत. मग संकष्टचतुर्थी येतांच यशोदेनें उपवासी राहून पूजा सामग्री तयार करून, शर्करा मिश्रित मोठमोठे एकवीस लाडू व मोदक केले, आणि नैवेद्याचा हारा भरून देव्हाऱ्यांत नेऊन ठेविला. चंद्रोदय होतांच, कृष्ण आईस ह्मणाला–माते ! मला लाडू कधीं देशील ? आई ह्मणाली–नैवेद्य दाखविल्यावर मग देईन. असें सांगून धूप दीप सामग्री आणण्याकरितां बाहेर गेली. श्रीकृष्ण देव्हाऱ्याजवळ एकटाच उभा होता, त्यानें एकांत पाहून सर्व नैवेद्य स्वाहा करून उगाच बसला. आई घरांत येऊन पाहते तों हारा देव्हाऱ्यावर रिकामा पडला आहे. तेव्हां तिला आश्चर्य वाटून नैवेद्य काय झाला ह्मणून कृष्णास विचारलें. कृष्ण ह्मणाला–माते ! आतां येथें एक हजार उंदीर आले होते त्यांत एक मोठा उंदीर होता त्यावर गणपती बसला होता, त्यानें सोंडेनें सर्व लाडू एकदांच भक्षण केले. त्याचें मोठें पोट व सोंड पाहून माझी बोबडी वळली ! आतां मला भूक फार लागली आहे लाडू दे.

तेव्हां आई क्रोधायमान होऊन ह्मणाली–तुझें तोंड उघडून दाखीव पाहूं ? कृष्ण दीनवदन करून ह्मणाला–लाडू पुष्कळ होते ते माझ्या मुखांत कसे मावतील ? गणपती लाडू खाऊन गेला आणि माझेवर आळ आला. यशोदा पुनः दटावून ह्मणाली–तूं तोंड उघड पाहूं ? मग कृष्णानें तोंड

उघडून दाखविलें तों वैकुंठ कैलासादि ब्रह्मांड व असंख्य गणपती यशोदेस दिसले, आणि मुखांतून गणपती यशोदेस ह्मणाला–हा देवाधिदेव तुझ्या पोटीं अवतरला आहे. आह्मी सर्व देव या कृष्णाचे अवयव आहों. असें पाहून व ऐकून यशोदा समाधिस्त झाली. थोड्या वेळानें सावध होऊन पाहते तों कृष्ण उभा असून, लाडू मागत आहे. त्यावेळीं आई सद्गदित होऊन कृष्णास उचलून त्याच्यासह भोजन करती झाली.

एकदां बळिभद्र व कृष्ण आंगणांत खेळत असतां, कृष्णानें माती तोंडांत घातली. तेव्हां बळरामानें आईस जाऊन सांगितलें. तोंच यशोदा हातांत छडी घेऊन, हरीजवळ येऊन दटावून ह्मणाली–तुझें तोंड उघड पाहूं! कृष्ण वर हात करून बोलला–बळिराम तुला खोटेंच सांगतो. असें बोलून तोंड उघडून आंत ब्रह्मांड दाखविलें. तेव्हां तिनें पूर्ण ब्रह्म असें ओळखिलें.

एके दिवशीं कृष्ण स्फटिक भूमीवर खेळत असतां, मला प्रतिबिंब काढून दे ह्मणून आळ घेतली. त्याची मातेनें पुष्कळ प्रकारें खेळणीं वगैरे देऊन समजूत घातली पण समजेना. मग तसाच टाकून स्वकार्यास निघून गेली. त्याचवेळीं कांहीं कामाकरितां राधा यशोदेच्या मंदिरांत आली तों कृष्ण पाळण्यांत रडत होता. त्याला पाहतांच राधेनें चावटा कां



श्रीकृष्णानें तोंड उघडून दाखविलें तों वैकुंठ कैलासादि ब्रह्मांड व असंख्य गणपती (विश्वदर्शन) यशोदेस दिसले.

Joshi Art P. Works, Bombay. 1.

रडतोस असें बोलून उचलून घेतला. त्याबरोबर रडण्याचा बंद झाला. तिला माता ह्मणाली—याला आपल्या घरास ने, येथें उगाच रहात नाहीं. मग राधेनें कृष्णास आपल्या घरीं नेऊन झोंपाळ्यावर बसविलें. त्यावेळीं तिचा नवरा कर्मासु घरांत नव्हतीं. राधा श्रीहरीस झोंपाळ्यावर झुलवीत असतां ह्मणाली—यावेळीं तूं जर तरुण असतास तर बरा विचार झाला असता. कृष्ण बोलला—मी आतां मोठा होईन. तें ऐकून राधा हांसून बोलली—गोविंदा ! तूं मोठा कसा होशील ? असें बोलतांच श्रीकृष्ण थोर झाला. त्याला घेऊन सुखसेजेवर निजली.

त्याच समयीं राधेचा भ्रतार अनया तुपाची कावडी भरून घरीं आला; तों दरवाजा बंद होता. असें पाहून नवरा राधेस ह्मणाला—दार उघड, तूं गुजगोष्टी कोणाजवळ बोलत आहेस ? भ्रताराचा शब्द ऐकतांच, राधा घाबरून, लहान होण्याची प्रार्थना करूं लागली. तोंच श्रीकृष्ण पांच वर्षांचा झाला. लगेच राधेनें दहींभात आणून श्रीहरीपुढें ठेवून, दार उघडावयास गेली. अनया घरांत येऊन कृष्णास पाहून त्यास उचलून चुंबन घेऊन, राधेस ह्मणाला—तुला एकटीला घरांत गमत नाहीं तरी कृष्णास खेळावयास घेऊन येत जा. राधेनें तें भ्रताराचें वचन मान्य केलें. तेव्हांपासून राधा कृष्णास नित्य घेऊन येत असे.

असे कांहीं दिवस लोटल्यावर गोकुळांत गुजगुज उठली कीं, कृष्ण राधेच्या घरीं थोर होतो. पूर्वीं शचीनें सात जन्म पर्यंत तप करून भगवंत भोगण्याची इच्छा धरिली होती तीच राधा गोकुळांत अवतरून कृष्णास भेटली. राधेच्या घरीं कृष्ण मोठा होतो ही गोष्ट यशोदेच्याही कानावर आली. गौळणी यशोदेस सांगूं लागल्या कृष्णास राधेच्या घरीं पाठवूं नका. मग यशोदा कृष्णास ह्मणाली–तूं राधेकडे जाऊं नको. जर रडण्याचें ढोंग करून जाशील तर तुला शिक्षा करीन. तेव्हां श्रीहरीनें मी जाणार नाहीं असें सांगितलें.

राधेच्या ह्मातार्‍या सासूस एक गोपी बोलली–तूं आपल्या सुनेला आवर घाल आणि कृष्णास घरीं आणूं नको. मग तिनें सुनेला ताकीद दिली. अशी लोकांनीं राधाकृष्णाची तुटी पाडतांच, राधेला चैन पडेना, तिला अन्न उदकपान गोड लागेना. एके दिवशीं प्रातःकाळीं यमुनेवर पाण्यास चालली असतां नंदसदनाजवळ उभी राहिली; त्याचवेळीं कृष्ण भरणा घेऊन धारा काढित होता, यशोदा भरलेला भरणा डेर्‍यांत नेऊन ओतीत होती. भरणा भरतांच कृष्ण मुखांत धारा सोडून घेई. तें पाहून यशोदा ह्मणाली–कृष्णा, असें काय करतोस ? कृष्ण बोलला–भरणा भरल्यावर गाईचा पान्हा आंखडल ह्मणून माझ्या तोंडांत धार काढतों. यशोदा

भरणा ओतण्यास गेल्यावर कृष्ण बाहेर पाहूं लागला तों राधा दृष्टीस पडली. तिला पाहतांच त्याचें चित्त चंचल होऊन भरणा घेऊन बैलाखालीं जाऊन बसला व बैलाचा वृषण ओढूं लागला, त्याचें त्याला स्मरण नाहीं. तेव्हां आई येऊन बोलली-गोपाळा ! हें काय करतोस ? तो राधेकडे नेत्र लावून मातेस ह्मणाला-गाईची धार काढतों आहें, भरणा भरला पहा ! माता ह्मणाली-अरे बैल कीं गाय तें तर पहा. कृष्ण बोलला-माते ! तूं देवाचा नवस चुकलीस ह्मणून आतांच चार थानाचें एक थान झालें. माता बोलली-तुझें मन ठिकाणावर नाहीं.

असें बोलत आहे तोंच दारांत राधा दृष्टीस पडली, तिला यशोदा ह्मणाली-अगे ! माथ्यावर घागर घेऊन येथें उभी कां? असें ऐकतांच ती चालती झाली. एके दिवशीं श्रीकृष्ण गोपाळांसह राधेच्या दारांत खेळावयास आला. त्यावेळीं राधा ओसरीवर मंथनास आरंभ करित होती; तिच्या श्रीहरी दृष्टीस पडला. तोंच तिचे नेत्र वेधून रित्या डेऱ्यांत रवी घालून घुसळूं लागली. डेऱ्याचा खडखड आवाज ऐकतांच सासु रागानें धांवत येऊन तुझे कान डोळे गेले काय ? असें बोलूं लागली. राधा ह्मणाली-मामीसें ! डेरा तगेल कीं नाहीं तो पाहात आहें. सासु ह्मणाली-अगे, तुझें मन स्थीर नाहीं. मग वृद्धा कृष्णास